**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2022, VOL- 10/71*
https://doi.org/10.21922/srjis.v10i71.10224

# शिक्षक- शिक्षणात बहुभाषिकता

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Paper Received On:** 22 JUNE 2022
**Peer Reviewed On:** 27 JUNE 2022
**Published On:** 28 JUNE 2022

**Abstract**

*N.C.T.E च्या 2014 शिक्षक-प्रशिक्षण अभ्यासक्रम पुनर्रचनेत Language Across Curriculum या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. बालक एखादी भाषा मातृभाषा अर्जित करण्यास प्रारंभ करते तेव्हा ते मातृभाषेपासून प्रारंभ होऊन जर त्या बालकाचे आई, वडील, पारिवारिक सदस्य दोन भाषा किंवा तीन भाषा संवादात उपयोगात आणत असतील तर त्यांच्या संवादामुळे त्याचा भाषा अर्जनाचा प्रवास एकभाषिक→ द्वैभाषिक→ अथवा एकभाषिक, द्वैभाषिक आणि बहुभाषिक अशा पद्धतीने होतो.*

***की वर्ड:*** *शिक्षक- शिक्षण, बहुभाषिकता*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1. प्रस्तावना

शिक्षक शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढावी म्हणून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने 2014 च्या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम पुनर्रचनेत बीएड अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असावा अशी शिफारस केली, तसेच अभ्यासक्रमांतर्गत भाषेची व्याप्ती (Language Across Curriculum) या विषयाचा समावेश करण्याची शिफारस केली, तसेच 2005 च्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातही त्रिभाषा सूत्राचा प्रभावीपणे अवलंब करावा असे सांगितले आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील विविध शिक्षण आयोगांनी भाषा शिक्षणावर विशेष भर दिलेला आहे, कारण ज्ञान देण्याचे व ज्ञानप्राप्तीचे प्रमुख माध्यम भाषा आहे.

भारत लोकशाही प्रधान भिन्न धार्मिक, भिन्न संस्कृती, भिन्न भाषिक देश आहे. म्हणूनच शिक्षणप्रक्रियेतही एका विशिष्ट भाषेलाच महत्व देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही या मुद्द्याचा विचार करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने 2014 च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शिक्षक

शिक्षणात बहुभाषिकता हा घटक समाविष्ट केलेला आहे. कोणत्याही राष्ट्राचा दर्जा त्या राष्ट्रात दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असतो तर शिक्षणाचा दर्जा शिक्षकांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्र शिक्षक बहुभाषिकता ही संकल्पना स्वतः आत्मसात करतील व नंतर ती विद्यार्थ्यांमध्ये रुजवतील हा त्यामागील प्रमुख हेतू आहे.

**2) कार्यात्मक व्याख्या**

**शिक्षक- शिक्षण:** 2014 च्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या आराखड्यानुसार राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने माध्यमिक स्तरावरील शिक्षक तयार करण्यासाठी तयार करण्यात आलेला दोन वर्षांचा अभ्यासक्रम

**बहुभाषिकता:** मराठी, हिंदी सह इंग्रजी वा अन्य कोणत्याही भाषांचा ( बोली व प्रमाण भाषांचा) संवादात, चर्चेत, अध्ययन-अध्यापनात सहज आणि सुगम पद्धतीने वापर म्हणजे बहुभाषिकता होय.

बहुभाषिकता म्हणजे काय ? तर बहुभाषिकता (Pollyglot) म्हणजे बहु (Polly) आणि भाषा (glot) म्हणजे बहुभाषी अशीही संज्ञा आहे. एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या, देशाच्या संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग केला जातो तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला बहुभाषिकता म्हणतात.

जागतिक लोकसंख्येच्या प्रमाणात एकभाषकांपेक्षा बहुभाषिकांची संख्या जास्त आहे. एखादी व्यक्ती एका भाषेपेक्षा अधिक भाषांमध्ये मौखिकरित्या, लिखित स्वरूपात किंबहुना गायनामधून सक्रिय असते तर काही भाषांमध्ये त्याच व्यक्तीची श्राव्यक्षमता, वाचनक्षमता ही थोडी अक्रियाशील असते. पण रीतसर ती भाषा ग्रहण न करताही समजू शकते. अशा दोन किंवा तीन भाषा अवगत असणाऱ्या व्यक्तीला बहुभाषिक आणि त्रैभाषिक असे देखील म्हणतात.

जागतिकीकरणाच्या युगात व्यक्तीला अनेक भाषांचा आधार आवश्यक बनलेला आहे. अलीकडील सर्वेक्षणात मानसोपचार तज्ज्ञांनी देखील असा निर्वाळा दिला आहे की, व्यक्ती जितकी बहुभाषिक असेल तितका त्या व्यक्तीचा मेंदू सक्रिय असतो. ( इंदुरकर, 2019)

**3) अभ्यासक्रमांतर्गत भाषा संकल्पना**

भाषा ही जीवनाची / संवादाची संवाहक असते, यासंदर्भात इंग्लंडमध्ये 1975 साली 'अभ्यासक्रमांतर्गत भाषा' "प्रो. अँलन बुलक" यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमला, त्यांनी अभ्यासक्रमांतर्गत भाषा या घटकासंदर्भात सखोल विवेचन करून, त्या अहवालास 'A Language for life' असे नाव दिले. त्यांच्या या अहवालातून सूचक विचार शिक्षणास प्राप्त झाले.1980 च्या दशकात

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

इंग्रजी विषय सोडून आणि इंग्रजी विषय, इंग्रजी माध्यमातून शिकविताना शिक्षकाची दृष्टी बदलली जाऊन अध्यापनाची दिशा व शैली बदलण्याची गरज प्रतिपादित केली.

**4) अभ्यासक्रमांतर्गत भाषा अध्ययनाची तत्वे**

❖ भाषासंपादन हे नैसर्गिक पद्धतीने होते न की ते शोध अध्ययनासारखे एखादा शब्द
त्याचा अर्थ आणि वापर याद्वारे तर ते सहज संवाद आणि संदर्भाने असते.

❖ द्वितीय भाषा संपादन हे आशयाद्वारे होते.

❖ लोक कधीच भाषा शिक्षण आणि भाषा शिकून वापरत नाही तर ते भाषा शिकत शिकत स्वतःच्या कौशल्याने भाषा शिकत असतात.

❖ भाषासंपादन हे सतत बोलण्याच्या सरावाने होते. (अहमद,2018).

❖ प्रभावी भाषा संपादनासाठी आशय हा बहुपयोगी असावा.

एकूणच अभ्यासक्रमांतर्गत भाषा ही नाविन्यपूर्ण संकल्पना असून सजग शिक्षक त्याचा सखोलतेने विचार व अभ्यास करून अध्यापन करताना भाषेतर विषयाचे अध्यापन करताना तत्वाद्वारे आपले अध्यापन कार्यनिती ठरवून उद्दिष्टे साध्य करतील. या उद्दिष्टानुगामी विचार करता त्यास स्तर निर्धारण करून उद्दिष्टे निश्चित झालेली आहेत ती फक्त अंमलात आणावयाची आहेत.

**5) अभ्यासक्रमांतर्गत भाषा फायदे**

❖ विद्यार्थ्यांना संभाषण कौशल्य सुधारण्याची संधी देणे.

❖ विद्यार्थ्यांना आशय प्रभावीपणे शिकण्यास मदत करणे.

❖विद्यार्थ्यांना आत्माभिव्यक्ती करण्यास मदत करते.

❖ विद्यार्थ्यांना शालेय वेळेत भाषासंपादन,संप्रेषणाची संधी भाषा व अन्य विषयातून उपलब्ध करून देणे.

❖ विद्यार्थ्यांना सामान्य शब्दांची व विषयाशी निगडीत शब्दांची ओळख व प्रयोगाची संधी उपलब्ध करून देणे.

**6) शिक्षक- शिक्षणात बहुभाषिकतेची गरज**

❖ 1964-66 चा कोठारी आयोग 1986 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासारख्या विविध शैक्षणिक आयोगांनी भाषा शिक्षणावर भर दिला असला तरी शाळा महाविद्यालयांमधून दिले जाणारे भाषाशिक्षण प्रभावीपणे दिले जात नाही.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

❖ कोठारी आयोगाच्या त्रिभाषा सूत्राचा जरी स्वीकार केलेला असला तरी, इंग्रजीसारख्या एखाद्या विशिष्ट भाषेला अधिक महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांचा समतोल बौद्धिक विकास करायचा असेल तर सर्वच भाषांना सारख्या प्रमाणात महत्त्व दिले पाहिजे.

❖ भारतात प्राचीन काळापासून बहुभाषिकता दिसून येते म्हणूनच राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने दोन वर्षाच्या बी. एड. अभ्यासक्रम आराखड्यात बहुभाषिकतेवर भर दिलेला आहे.

❖ शाळेतील विद्यार्थ्यांची मातृभाषा, त्यांची बोलीभाषा शालेय भाषा, प्रमाणभाषा याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम असतो. विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी भिन्न-भिन्न असते.
विद्यार्थी शिक्षक, शिक्षक विद्यार्थ्यांना भिन्न भाषिक समाजात बहुभाषिकता कशी महत्त्वाची आहे हे सांगण्यासाठी.

❖ विद्यार्थी-शिक्षकांमध्ये बहुभाषिकता ही संकल्पना चांगल्या प्रकारे रुजली तरच ते शिक्षक झाल्यावर बहुभाषिक वर्गासाठी अध्यापनाचे नियोजन प्रभावी करतील.

**7) शिक्षक- शिक्षणात बहुभाषिकतेचे महत्त्व**

❖ बी.एड.चे विद्यार्थी शिक्षक, शालेय विद्यार्थी, शालेय शिक्षक यांना बहुभाषिकतेबाबतचा व्यापक दृष्टिकोन मिळेल.

❖ बी.एड.चे विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी, शाळेतील शिक्षक यांना आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना अधिक चांगल्या प्रकारे मांडण्यासाठी बहुभाषिकतेची उपयुक्तता लक्षात येईल त्यामुळे ते बहुभाषिकतेचा पुरस्कार करून बहुभाषिकतेला चालना देतील.

❖ कोणतीही विशिष्ट भाषा अधिक महत्त्वाची व अमुक भाषा कमी महत्त्वाची असा भाषेबाबतचा संकुचित विचार बी.एड.चे विद्यार्थी शिक्षक, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी करणार नाहीत.

❖ विद्यार्थी, शिक्षक, बी.एड.चे विद्यार्थी-शिक्षक यांच्या मनात सर्वच भाषांबाबत आदराची भावना निर्माण होईल, तसेच भाषांमुळे होणारे वादविवाद टाळता येऊन ऐक्याची भावना वाढीस लागेल.

❖ बी.एड. चे विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी शाळेतील शिक्षक यांना एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी असलेला सहसंबंध अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल.

❖ विद्यार्थ्यांना बहुभाषिक होण्यास मदत होईल, बहुभाषिकतेच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत कमालीची भर पडते, त्यामुळे त्यांचा बौद्धिक विकास होऊन विद्यार्थी जागतिक स्पर्धेसाठी तयार होतील.

**8) बहुभाषिकता रुजविण्यासाठी उपाय योजना**

❖ मुलांनी एका वेळी अनेक भाषा शिकणे ही समस्या नसून ती एक क्षमता व ठेव आहे याबाबत जागरूकता घडविणे.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

❖ आपल्या स्वतःच्या परिसर भाषा, बोलीभाषा, मातृभाषा याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड व कमीपणाची भावना निर्माण होणार नाही असे सकारात्मक वातावरण शिक्षकांनी तयार करावे.

❖ विद्यार्थ्यांच्या परिसर भाषा व बोलीभाषा यांचा योग्य प्रमाणात जाणीवपूर्वक सकारात्मकरीत्या शाळा महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर अध्ययन अध्यापनामध्ये योग्य प्रमाणात वापर करावा.

❖ जागतिकीकरणाची आव्हाने पेलण्यासाठी, ज्ञान समृद्ध करण्यासाठी, शाश्वत विकासासाठी बहुभाषिक शिक्षणाची गरज आहे हा विचार विद्यार्थी शिक्षक व पालकांमध्ये रुजवावा.

❖ जर विद्यार्थ्याला त्याची मातृभाषा वापरण्याची मुभा दिली तर इतर विद्यार्थ्यांनाही भाषिक व विविधतेचे जाणीव होते. भाषेच्या रचनेप्रति म्हणजेच भाषेबद्दलची संवेदना (metalinguistic awareness) वाढीस लागते. आणि यातूनच भाषा अधिक चांगली शिकण्यास मदत होते. भाषेबद्दलची संवेदना वाढीस लागण्यातूनच वाचन, आकलन आणि वरच्या पातळीवरील तार्किक विचारक्षमता ( higher order thinking ) यांनासुद्धा उत्तेजन मिळत असते. हे मुद्दे शिक्षकांना पटवून द्यावे.

❖ अमेरिकेतल्या राष्ट्रीय द्वैभाषिक शिक्षण संघाने असे नोंदवले आहे की, भाषिक, शिक्षणामुळे शैक्षणिक दर्जा सुधारतो. परीक्षांमधील गुणवत्ता वाढते. शाळेतून गळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होते, आणि विद्यार्थी गैरहजेरीचे प्रमाण कमी होऊन, शिक्षण प्रक्रियेत सहभागी होण्याची सामूहिक इच्छा वाढते. तसेच विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानातही लक्षणीय फरक पडतो. बहुभाषिकतेच्या या फायद्यांचा समाजामध्ये प्रसार करावा.

❖ आदिवासी भागातील मुलांमध्ये शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी आदिवासी बोली भाषांचे जतन व्हावे यासाठी शैक्षणिक, सामाजिक व शासकीय स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

❖ अध्ययन अध्यापनामध्ये एखाद्या विशिष्ट भाषेलाच अधिक महत्व न देता सर्वच भाषांना सारख्या प्रमाणात महत्त्व देऊन सर्व भाषांबाबत सारख्याच प्रमाणात आदर व्यक्त होईल असे आचरण असावे.

❖ वर्गामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत व बोलीभाषेत बोलण्याची संधी द्यावी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांना अध्ययनात गोडी निर्माण होते.

❖ विद्यार्थ्यांनी केवळ प्रमाणभाषेत तोच आपले विचार मांडावेत असा आग्रह शिक्षकांनी जळू नये धरू नये

परिसर भाषेतून व बोलीभाषेतून व्यक्त होणाऱ्या विद्यार्थ्यांचा वर्गामध्ये अपमान होणार नाही याची शिक्षकांनी खबरदारी घ्यावी

❖ भाषिक विविधता, विविध भाषेतील साम्य व भेद यामुळे निर्माण होणारे विनोद व गमती जमती याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

❖ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये भाषा हडपसर अडथळा ठरणार नाही याबाबत शिक्षकांनी विशेष काळजी घ्यावी

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भाषा माहीत करून घेऊन काही प्रमाणात त्यांच्याशी त्यांच्या भाषेतील शब्द वापरून संवाद साधण्याचा प्रयत्न करावा यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांबाबत आपुलकी निर्माण होते.

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांची घरची भाषा परिसर भाषा शालेय भाषा प्रमाणभाषा यामधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करावा

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्थानिक भाषेतील लोकगीते गोष्टी लोकनृत्य म्हणी वाक्प्रचार यांच्या सादरीकरणाची संधी द्यावीविशिष्ट मिस सण साप समारोप समारंभ

❖ विविध भाषेतील भाषांतरित तसेच सिद्ध प्रसिद्धसाहित्य वाचनाची विद्यार्थ्यांना प्रेरणा द्यावी

❖ विविध भाषेतील वृत्तपत्रांचे वाचन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे

विविध भाषिक चित्रपट गाणी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रपट त्यांचा यांचाआस्वाद घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे

❖ आकाशवाणी दूरदर्शन विविध वाहिन्या यावरून सादर केले जाणारे विविध भाषेतील कार्यक्रम, स्टोरी टेलिंग सारखे ॲप, गुगल ट्रान्सलेटर, गुगल  लेन्स याबाबत विद्यार्थ्यांना माहिती सांगावी तसेच फेसबूक, ट्विटर, मेसेंजर, व्हाट्सअप यांसारख्या समाज माध्यमांवर उपलब्ध असणाऱ्या विविध भाषांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी.

## संदर्भ

*Annamalai, E. (2001). Managing Multilingualism in India: Political and Linguistic Manifestation. New Delhi: Sage Publication.*

*Ambridge, B. and Lieven, E.V.M.(2011). Language Acquisition Contrasting therotical approaches . Cambridge: Cambridge University Press.*

*Asubels, D. (1968).Educational Psychology: A Cognitive View, Holt, Rinehart and winston Publication.*

*·Akmajian, A. (2010).Linguistics: Introduction to language and communication. (6th ed.)*

*· Bakers, C. and Prys Jones (1998). Encyclopaedia of Bilingualism and Bilingual education. Clevedon.multilingual matters.*

*· Chomskey, N.C. (1965). Aspects of the theory of Syntax, MIP Press.*

*Dug, H.R. (1997). Ecology of Multilingualism, yashoda publication,mysore.*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*